IJNRD.ORG ISSN : 2456-4184
INTERNATIONAL JOURNAL OF NOVEL RESEARCH AND DEVELOPMENT (IJNRD) | IJNRD.ORG
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# स्त्रीकथनातील बदलते प्रवाह

**Monali Raut**

मराठी साहित्याच्या प्रांगणामध्ये आंबेडकरवादी साहित्याचा प्रवेश झाला आणि मराठी मन खडबडून गेले. एका नवीन व्यथा-वेदनांनी मंडित झालेल्या आशयाचे लेणे मराठी वाचकास प्राप्त झाले. अशा या आंबेडकरी साहित्याच्या प्रवाहातील आंबेडकरवादी स्वकथन हा एक अत्यंत महत्त्वाचा घटक होय. या आंबेडकरवादी स्वकथनांनी एकूणच मराठी साहित्याच्या कक्षा विस्तीर्ण केल्या आणि त्याबरोबरच या साहित्याला मूल्यगर्भतादेखील प्राप्त करूनदिली.

उर्मिला पवार यांचे 'आयदान' हे स्वकथन मराठी साहित्य विश्वामध्ये ५ डिसेंबर २००३ ला पदार्पण झाले. आंबेडकरवादी स्वकथनांची पूर्वपरंपरा 'आयदान'ने जिवंत सामाजिक जाणिवेने वृद्धिंगत केली. 'आयदान स्त्रीकथनातील नवे पर्व' या पुस्तकात ''आयदान' या उर्मिला पवार यांच्या आंबेडकरवादी स्वकथनाचा चिकित्सक अभ्यास केला आहे. आयदानच्या अनेकानेक पैलूंवर सखोल वृत्तीने प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

आयदान स्त्रीकथनातील नवे पर्व' यात सर्वप्रथम आंबेडकरवादी साहित्य या संकल्पनेचा गंभीरपणे अभ्यास साकार केलेला आहे. मराठी साहित्य विश्वामध्ये या आंबेडकरवादी साहित्याची संकल्पना ही दलित साहित्याच्या अनुषंगाने कशी रूढ झाली व या साहित्याचाउदय कसा झाला याची मूलभूत चिकित्सा येथे अनुस्यूत आहे. या पुस्तकात आंबेडकरवादी साहित्याचे स्वरूप स्थूल रूपात रेखांकित केलेले आहे. त्याचबरोबर आंबेडकरवादी साहित्याचा विकास कसा होत गेला याचीही चर्चा येथे संक्षिप्त रूपात साकारलेली आहे.

आंबेडकरवादी साहित्याची परंपरा शोधताना आपणास बुद्ध-चार्वाक यांचे तत्त्वज्ञान उपयोगाचे पडते. पण खऱ्या अर्थाने या साहित्याला खास स्वतःचे अस्तित्व भान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापासूनच प्राप्त होते. डॉ. आंबेडकरांच्या महात्म्य प्रेरणेतूनच आंबेडकरवादी साहित्याचा उदय झालेला आहे आणि आंबेडकरवादी स्वकथनांनादेखील प्रेरणा हीच आहे. बाबासाहेबांनी या देशातील दलित, शोषित, पीडितांना आपला परिवर्तनाचा गतिमान विचार दिला आणि यातूनच आंबेडकरी साहित्याच्या शाखोपशाखांना लळदून बहार आला.

प्रस्तुत आयदान स्त्रीकथनातील नवे पर्व' या पुस्तकात आंबेडकरवादी स्वकथनांच्या स्वरूपावर साक्षेपी वृत्तीने प्रकाश टाकण्यात आलेला आहे. मराठीमध्ये स्वकथनांच्या निर्मितीपूर्वी आत्मचरित्रे, आत्मकथने हे प्रकार रूढ होते. पण या सर्वांपेक्षा स्वकथन हा प्रकार वेगळा आणि अधिक मूलगामी आहे. 'आयदान' हे देखील मराठीतील स्वकथन आहे. हे केवळ मराठीतील स्वकथन नाही तर ते मराठीतील आंबेडकरवादी स्वकथन आहे. 'आंबेडकरवादी स्वकथन' म्हणजे नेमके काय? व या स्वकथन प्रकाराचे वेगळेपण कसे जाणवते याचे विवेचन येथे साकारण्यात आले आहे. या निमित्ताने मराठीतील आंबेडकरवादी स्वकथनांचा संक्षिप्त रूपात परिचय प्राप्त करून देण्यात आलेला आहे.

'आयदान' हे उर्मिला पवार यांचे अत्यंत प्रभावशाली असे आंबेडकरवादी स्वकथन आहे. 'आयदान'पूर्वी मराठीमध्ये अनेकानेक स्वकथने निर्माण झालेली दिसून येतात. आंबेडकरवादी स्वकथनांना 'बलुतं' आणि 'उपरा' या सारखी कर्तबगार पूर्व परंपरा आहे.. 'कोल्हाट्याचं पोर' आणि 'आमचा बाप आणि आम्ही' या सारखी नवपरंपराही आहे. पण तरीही 'आयदान' हे या सर्वच स्वकथनांना एका वेगळ्याच उंचीवर नेऊन पोचवताना दिसते. उर्मिला पवार

यांच्या 'आयदान' या स्वकथनाची मूलभूत चिकित्सा प्रस्तुत शोध प्रबंधामध्ये साकार करण्यात आली आहे. या 'आयदान'च्या वेगळेपणाची चर्चा या लेखनामध्ये सर्वत्र दिसून येते.

दुसऱ्या बाजूने आपल्यास हे दलित स्त्रीवादी स्वकथनही ठरते. दलित स्त्रियांची आत्मकथने यापूर्वी आलेली आहेत. पण 'आयदान'चं महत्त्व आहे ते एका दलित स्त्रीचं आत्मकथन म्हणून नव्हे तर दलित स्त्री जाणिवेचं रूपांतर एका व्यापक सामाजिक आकलनात करणाऱ्या आत्मकथन म्हणून. आत्मकथनाची सुरुवात लेखिकेने तिच्या बालपणातील इतरांनी सांगितलेल्या, ऐकलेल्या अनेक आठवणींनी होते. या आठवणींमधून रानवस्तीतल्या बाजारात डोक्यावर गवताचे भार, लाकडाच्या मोळ्या, नाचणीच्या लाटा, आंबे-केशर असे ओझे घेऊन पायी निघालेल्या गावातल्या, नात्यातल्या, कष्टकरी दलित स्त्रियांचे समूहातील एक होऊन जगणे समजते. दलित कष्टकरी स्त्रीचे जिवंत, रससंपन्न जगणे, चिकाटीपणा या आत्मकथनामध्ये जागोजागी जाणवतो. मुलगी म्हणून आपण नकोसे असल्याची जाणीव करून देणारे बालपण विमलने अनुभवले आहे. जीवनाच्या खुल्या शाळेत मिळालेल्या अनुभवामधून लेखिकेकडे जगण्याचा सहज स्वीकार करण्याची जाणीव, समजूतदारपणा आला असावा. त्याची पाळेमुळे बालपणात असावीत. या आत्मकथनात दिसणारी खोडकर, नर्मविनोदी मिश्कीलवृत्ती हे लेखिकेने लहानपणापासून संपूर्ण आयुष्यभर जे सोसले त्याचे सार आहे असे वाटते.

स्वकथनातील स्वतःला स्वतःच्या नजरेतून पाहण्याची, व्यक्त होण्याची गरज ही एकच कृती अनेक सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ सूचित करते. मानवी नात्यांच्या साखळींसह जगताना व्यक्तीला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव होणे हा आत्मकथनातील

सर्वात महत्त्वाचा भाग आहे. आत्मभान आल्यांनंतर व्यक्तीला प्रत्यक्ष जीवन व्यवहारातील विसंगती, कोंडमारा, पिचलेपणा, संकुचितपणा नवे दृष्टीने जाणवतात. स्वतःला प्रश्न विचारून जगण्यातील अर्थपूर्णता, निरर्थकता शोधणे हा व्यक्तिजाणिवेचा प्रदीर्घ प्रवास आत्मकथनातून व्यक्त होतो. व्यक्तीला जन्मजात लाभलेला सामाजिक स्तर, मानवी नात्यांच्या प्रतिमांमधून येणारी स्वामित्वाची जाणीव, यांच्या संदर्भातून व्यक्तीला स्वतःच्या स्वतंत्र इच्छा विचार भावनांची जाण येणे हा दुसरी प्रवास आत्मकथनातून स्पष्ट होतो.

या प्रवासामध्ये व्यक्तीचे आजन्म होणारे सामाजिककरण हा घटक खूप महत्त्वाचा आहे असे वाटते. सामाजिककरणाच्या चौकटीत व्यक्ती स्वतंत्र, आत्मनिर्भर होऊन जगणे हा संदर्भ घेऊन दलित स्त्री-आत्मकथनाचा विचार केल्यास काही वेगळेपणा निश्चितपणे जाणवतो. यामध्ये दलित जाणिवा, दलितत्व, पुरुषसत्ता, स्त्रीत्व तसेच कष्टकरी असण्याचे संदर्भ जाणवतात. व्यक्तीवर होणारा सामाजिक संस्कार हा धागा घेऊन दलित स्त्री आत्मकथनाचा विचार करताना दलित स्त्रीला आत्मभान येण्यामागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार-क्रांती-उत्थान, दलित चळवळींचे योगदान घ्यावे लागते. दलित स्त्रीने पुरुषसत्तेला, जातिव्यवस्थेला प्रश्न विचारत स्वतःच्या जगण्यामधून दलितत्वाचा, स्त्रीत्वाचा अर्थ शोधणे हा तिच्या आत्मकथनातील महत्त्वाचा भाग आहेच. त्याचबरोबर आत्मभानाच्या जाणिवेतून दलित स्त्रीने स्वतःचा भौतिक अवकाश निर्माण करणे, व्यक्त होणे अधिक अर्थपूर्ण होते.

वर्तमानकाळातील नव्या दृष्टीने जगलेल्या भूतकाळाचे अवलोकन करताना व्यक्तीचे कुटुंब, गणगोतात, शेजारी, समवयस्क यांच्यासह समूहातील एक होऊन जगणे; जीवनावर परिणाम करणाऱ्या घटना, शिक्षणातून बदलणारे विचार, स्वतःची जाणीव होणे, बदलता आर्थिक स्तर, सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतरांमुळे

एका मोठ्या सांस्कृतिक वर्तुळात होणारा व्यक्तीचा प्रवेश, अशी सामाजिककरणाची प्रक्रियाच आत्मकथनातून समजते. 'आयदान' हे उर्मिला पवार यांचे वैचारिकदृष्ट्या प्रगल्भ असलेले स्वकथन आहे. या 'आयदान'तील पात्रसृष्टी वैविध्यपूर्ण आहे. या 'आयदान'मधून साकारली जाणारी जीवन जाणीव प्रगल्भशील वृत्तीची आहे. या 'आयदान'ची लेखिका ही परिपक्व चिंतनशील विचारवंत असल्याने या स्वकथनाला आपसूकच मूल्यगर्भता प्राप्त झालेली आहे. डोळस व प्रगल्भ वैचारिकता हा या 'आयदान'चा प्राण आहे. या 'आयदान'तील आशयद्रव्य प्रगल्भशील जाणीवांनी ओथंबलेले आहे. या 'आयदान'ची अभिव्यक्ती ललितपूर्ण बंधनांनी नटलेली नाही. पण ही अभिव्यक्ती 'आयदान'तील आंबेडकरी समाजाला जिवंत रूपात वाचकांसमोर साकार करणारी आहे. उर्मिला पवार यांच्या या 'आयदान'मधून आशय अभिव्यक्तीचे एकरूपत्व आपल्यासमोर प्रतीत होते.

'आयदान' हे एका निस्सीम कार्य करणाऱ्या कार्यकर्त्याचे स्वकथन आहे. म्हणूनच या स्वकथनाला ऐतिहासिक व समाजशास्त्रीय परिमाण प्राप्त झालेले आहे. प्रत्यक्ष बाबासाहेबांचा सहवास या वस्तीतिल लोकांना अप्रत्यक्ष रीतीने लाभलेला आहे. धर्मांतराच्या सोहळ्यामध्ये व धर्मांतराच्या प्रक्रियेमध्ये प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीतीने सहभागी झालेले लोक 'आयदान'मध्ये दिसतात. या संपूर्ण घटना प्रसंगांना 'आयदान' या स्वकथनामधून उर्मिला पवार यांनी चिंतनशील वृत्तीने रेखाटले आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये या संपूर्ण प्रक्रियेची सूक्ष्मपणे चिकित्सा केली आहे

उर्मिला पवार यांचे 'आयदान' हे स्वकथन आंबेडकरवादी स्वकथनांना एक नवे परिमाण देणारे आहे. प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये 'आयदान'च्या वेगळेपणाची स्वतंत्रपणे चिकित्सा करण्यात आली आहे. या 'आयदान'ला रत्नागिरीच्या मातीचा स्पर्श लाभलेला आहे. कोकणी, मालवणी बोलीच्या गंधाने या वस्तीतील आशयद्रव्यसाकार झाले आहे .

संदर्भ ग्रंथसूची

१) कवठेकर बाळकृष्ण, 'दलित साहित्य एक आकलन', अजब पुस्तकालय, कोल्हापूर, इ.स. १९८१

२) कसबे रावसाहेब, 'आंबेडकर आणि मार्क्स', सुगावा प्रकाशन, पुणे, इ.स. १९८५

३) डॉ. कार्व्हलो सिसिलिया, काळसेकर सतीश (संपादक), 'आयदान सांस्कृतिक ठेवा', लोकवाङ्मय गृह मुंबई, इ.स. २००७

४) कुलकर्णी आरती, 'दलित स्वकथने साहित्य स्वरूप', विजय प्रकाशन, नागपूर, इ.स. १९९१

International Research Journal
IJNRD
Research Through Innovation